महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित**

**परिमंडल कार्यालयांची प्रकल्पग्रस्तांकरीता जाहिरात क्र. ०४/२०१७ अंतर्गत तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ (पुर्वीचे पदनाम- तंत्रज्ञ श्रेणी-४) या पदावर नेमणूक करण्यासाठी तात्पुरती निवड करण्यात आलेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्याबाबत**

संदर्भ:- दि. ०७.०४.२०१८ रोजी परिमंडल निहाय प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या निवड /प्रतिक्षा यादया

---------

महापारेषण कंपनीच्या परिमंडल कार्यालयांनी प्रकल्पग्रस्तांकरीता प्रसारित केलेल्या जाहिरात क्र. ०४/२०१७ च्या अनुषंगाने तांत्रिक कर्मचारी श्रेणी-६ या पदासाठी दि. ०७.०४.२०१८च्या अधिसूचनेद्वारे प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या निवड याद्यांमधील उमेदवारांना सदर अधिसूचनेमधील अटी व शर्तींच्या अधीन राहून मूळ कागदपत्रांच्या पडताळणीकरीता बोलविण्यात येत आहे.

२. त्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, सदरहू अधिसूचनेमध्ये नमूद केलेल्या **परिमंडल निहाय तात्पुरत्या निवड सूचीतील उमेदवारांनी दि. २४.०४.२०१८ ते दि. २५.०४.२०१८ रोजी संबंधित परिमंडल कार्यालयात** खाली नमूद केलेले **मूळ कागदपत्रे** व **त्यांच्या साक्षांकीत छाया प्रतींच्या एक संचासह** कार्यालयीन वेळेत हजर राहून कागदपत्रांची पडताळणी करून घेणे आवश्यक आहे.

- शिकाऊ उमेदवारी कायदा-१९६१ अंतर्गत राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT), नवी दिल्ली यांनी प्रदान केलेले वीजतंत्री या व्यवसायातील राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रमाणपत्र

**किंवा**

- औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून वीजतंत्री व्यवसायातील पाठ्यक्रम पूर्ण केल्यानंतर राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT), नवी दिल्ली यांनी प्रदान केलेले वीजतंत्री या व्यवसायातील राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र
- जन्मतारीखे करीता एस.एस.सी. प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला
- जातीचा दाखला (मागास प्रवर्गातून अर्ज केल्यास)
- जात वैधता प्रमाणपत्र ( असल्यास-मागास प्रवर्गातून अर्ज केल्यास )
- नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्र (मागास प्रवर्गातून अर्ज केल्यास /लागू असल्यास)
- महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र
- मराठी भाषा प्रमाणपत्र (जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे)
- नावातील बदलाचे प्रमाणपत्र (बदल केला असल्यास /लागू असल्यास)
- 'वीजतंत्री' या व्यवसायातील उमेदवारी पूर्ण केल्याबाबतचे तदर्थ म.रा.वि. मंडळ / महापारेषण कंपनीने जारी केलेले वैध प्रमाणपत्र (ॲप्रेंटीसशीपबद्दल अर्जात उल्लेख केला असल्यास)
- संबंधीत जिल्हाधिकारी / जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी जारी केलेले प्रकल्पग्रस्त असल्याबाबतचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र
- महापारेषण कंपनीच्या प्रकल्पग्रस्तांनी कौशल्य विकास योजनेअंतर्गत वाढीव गुणांची मागणी केली असल्यास संबंधित परिमंडलाचे प्रमाणपत्र अर्ज भरताना जारी केले होते त्याची प्रत सोबत आणावी.
- ओळखपत्र म्हणून 'पॅन कार्ड (PAN Card) / पासपोर्ट (Passport) /वाहन परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter's Card) / अलीकडचे छायाचित्र असलेले बँकेचे पासबूक (Bank Passbook with photograph) / राजपत्रित अधिकाऱ्याने अधिकृत letter head वर जारी केलेले अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र / लोकप्रतिनिधिने अधिकृत letter head वर जारी केलेले अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र / मान्यताप्राप्त महाविद्यालय / विद्यापिठाकडील अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र ( valid recent Identity Card issued by a recognized college / university) / छायाचित्र असलेले आधार कार्ड (Aadhar card

with a photograph) / कर्मचारी ओळखपत्र (Employee ID) / अलीकडचे छायाचित्र असलेले बार कॉंसीलचे ओळखपत्र (Bar Council Identity card with photograph) यापैकी कोणतेही एक मूळ ओळखपत्र आणावे.

- महिला प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतांना जी माहिती भरली आहे त्या माहितीच्या आधारेच त्यांचे ऑनलाईन परिक्षेचे पत्र तयार होईल. महिला उमेदवारांचे परिक्षा पत्रात (Call letter) नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे / पतिचे नाव, आडनाव व छायाचित्र ओळखपत्रावर नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे/पतिचे नाव व आडनाव हे एकसमान असणे आवश्यक आहे.

३. कागदपत्रे पड़ताळणीस हजर राहण्याबाबत प्रत्येक उमेदवारास त्याने ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या ई-मेल पत्यावर संबंधित परिमंडल कार्यालयातर्फे पत्र पाठविण्यात येत आहे. पत्र प्राप्त झाल्यानंतर त्याची पोच ई-मेलद्वारे देण्यात यावी. तसेच, सदर परिमंडल कार्यालयातर्फे उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या मोबाईलवर संदेश सुध्दा पाठविण्यात येईल.

४. जर सदर पडताळणी करिता उमेदवार हजर न राहिल्यास सदर उमेदवार निवडी करिता इच्छुक नाही असे समजता येईल याची कृपया गांभीर्याने नोंद घेण्यात यावी.

५. कागदपत्रे पडताळणीकरीता उमेदवारास बोलाविण्यात आले म्हणून त्यांना नेमणूक मिळण्याबाबतचा कोणत्याही प्रकारचा हक्क प्राप्त होत नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

६. तात्पुरत्या प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना संबंधित परिमंडल कार्यालयाकडून आवश्यकता असल्यास सुचित केले जाईल. त्यामुळे त्यांनी परिमंडल कार्यालय किंवा मुख्य कार्यालयास संपर्क करू नये.

**दिनांकः- १७.०४.२०१८** **मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*************